# बीजाआधीची भूमी

**अन्य कोणतीही गोष्ट जे रुजवू शकत नाही, ते श्रद्धा रुजवते**

## दाजी

**पूज्य श्री चारीजी महाराज**

यांच्या 99 व्या जयंतीनिमित्त, पूज्य दाजी यांचा संदेश

24 जुलै, 2026

# बीजाआधीची भूमी

## अन्य कोणतीही गोष्ट जे रुजवू शकत नाही, ते श्रद्धा रुजवते

प्रिय मित्रांनो,

कल्पना करा की दोन साधक एकाच ध्यानकक्षात बसले आहेत, दोघांनाही तीच प्राणाहुती प्राप्त होत आहे, दोघेही तेच शब्द ऐकत आहेत आणि एकाच क्षणी आपले डोळे मिटून घेत आहेत. ध्यानानंतर, त्यांच्यापैकी एक साधक उठतो आणि त्याच्यामध्ये काहीतरी बदललेले असते - शांतपणे आणि अपरिवर्तनीयपणे - जणू काही होकायंत्राची (कंपास) सुई पहिल्यांदाच उत्तर दिशा शोधत आहे. दुसरा साधक उठतो, वेळ पाहतो आणि त्याला कुतूहल वाटते की इतरांना काय जाणवत असावे. ती प्राणाहुती, ती शांतता आणि ते शब्द अगदी सारखेच आहेत, परंतु त्यामध्ये एक फरक आहे. तो कोणता? हा प्रश्न सध्या मनातच ठेवा; कारण आपण त्याच्याकडे पुन्हा वळणार आहोत.

याच प्रकारे, एका पातेल्यात बटाटा आणि अंडे पाण्यात उकळत असल्याची कल्पना करा. पाणी, उष्णता आणि शिजवण्याचा कालावधी हे सर्व समान असूनही बटाटा मऊ होतो, तर अंडे घट्ट होते. आपल्यापैकी प्रत्येकजण स्वतःमध्ये नेमके काय बाळगून असतो - (आपल्या धारणा व समजुती कोणत्या आहेत), यावरच आपला अनुभव आपल्याला अधिक खुले करतो की अधिक संकुचित करतो हे ठरते; आणि हा गुणवत्तेचा किंवा पात्रतेचा प्रश्न नाही, तर तो केवळ अंतर्मनाच्या भूमीचा (मातीचा) प्रश्न आहे.

# ज्या शब्दाचे यथार्थ भाषांतर होऊ शकत नाही...

मागील संदेशांच्या मालिकेत, आपण सर्वांनी मिळून एका साधकाला, त्याची वाट पाहत असलेल्या खऱ्या जीवनापासून दूर ठेवणाऱ्या सात आंतरिक अडथळयांचा ऊहापोह केला. आपण पाहिले की कशा प्रकारे इच्छा-वासना विभाजन करतात, जडत्व गुदमरवून टाकते, संशय पोखरतो, अभिमान बंदिस्त करतो, मत्सर हतबल करतो, पूर्वाग्रह खिडक्या बंद करतो आणि या सर्वांची जननी असलेली ती भीती दरवाजाला आतून कडी लावून घेते. ‘न जगलेले जीवन’ यामध्ये आपल्याला उमगले की तो बंद दरवाजा उघडण्यासाठी श्रद्धाच किल्ली फिरवते आणि तो उंबरठा ओलांडून पलीकडे गेल्यावर आपल्याला जे प्रथम जाणवते, ते एखादे ध्येय नव्हे, तर तिथल्या भूमीचा कस किंवा तिची गुणवत्ता असते; आणि प्राचीन ऋषी-मुनींनी यालाच ‘श्रद्धा’ म्हटले आहे.

‘श्रद्धा’ या शब्दाचे इंग्रजी भाषांतर ‘फेथ’ (faith) म्हणजे केवळ ‘विश्वास’ असे केले जाते, पण ते अपूर्ण आहे. सहसा, ‘फेथ’चे वर्णन - जी गोष्ट तुम्ही पुराव्यानिशी सिद्ध करू शकत नाही, तिच्यावर विश्वास ठेवणे - असे केले जाते; याउलट ‘श्रद्धा’ ही संकल्पना यापेक्षा कितीतरी जिवंत - चैतन्यमय आहे. श्रद्धा म्हणजे विश्वास, आत्मविश्वास, प्रामाणिकपणा, दृढनिश्चय, निष्ठा आणि आंतरिक खात्री यांचे एकाच ज्योतीमध्ये झालेले एकीकरण आहे. श्रद्धा म्हणजे केवळ एखाद्या प्रस्तावाशी मनाने सहमत होणे नव्हे, तर बुद्धीने पुराव्याची पडताळणी पूर्ण करण्यापूर्वीच, संपूर्णत: स्वतःला हृदयाच्या सत्याकडे वळवणे होय.

ज्ञानी लोक श्रद्धेचा अर्थ असा सांगतात - संतवाङ्मय, धर्मग्रंथ आणि सद्गुरू यांच्या वचनांवर विश्वास ठेवणे आणि त्याद्वारे जे साध्य करणे शक्य आहे ते साध्य करणे. आता, खरी गहनता ‘विश्वास’ या शब्दातच दडलेली आहे : विश्वास म्हणजे एखाद्या संकल्पनेचा केवळ वरवरचा स्वीकार नव्हे; परंतु ऐकीव गोष्टींवर नव्हे, तर आपण स्वतः अनुभवलेल्या सत्याप्रत आपले मन, बुद्धी आणि संपूर्ण शक्ती पूर्णपणे एकाग्र करणे होय.

आंतरिक अनुभूतीचे महान शिल्पकार - महर्षी पतंजली यांनी सर्वोच्च साक्षात्काराकडे नेणाऱ्या पाच गुणांच्या क्रमवारीमध्ये श्रद्धेला प्रथम स्थान दिले. ते पाच गुण म्हणजे : श्रद्धा, वीर्य (ऊर्जा), स्मृती (स्मरण), समाधी (तल्लीनता) आणि प्रज्ञा (विवेक).

या क्रमाकडे बारकाईने लक्ष द्या : श्रद्धा ऊर्जेला किंवा प्रयत्न करण्याच्या इच्छेला चालना देते; ऊर्जा स्मरण टिकवून ठेवते; स्मरण तल्लीनतेत परिपक्व होते; आणि तल्लीनतेतून विवेकाचे फूल उमलते. ही संपूर्ण साखळी पहिल्या दुव्यावर अवलंबून असते. श्रद्धाच काढून टाकली, तर उर्वरित सर्वकाही तळमजला नसलेल्या जिन्याच्या पायऱ्यांप्रमाणे कोसळून पडेल.

## अनपेक्षित आत्मविश्वास

आपण बहुधा श्रद्धेचा विचार केवळ ईश्वर, गुरू आणि आपली साधना यावरील विश्वास म्हणूनच करतो; आणि श्रद्धेत या सर्वांचा अंतर्भाव होतोच. पण हे जाणून तुम्हाला नवल वाटेल की श्रद्धेची खरी सुरुवात तर आपल्या स्वतःपासूनच होते. जेव्हा आपल्यामध्ये आत्मविश्वासाचा अभाव असतो, तेव्हा आपल्यात श्रद्धेची कमतरता असते. जेव्हा या मार्गावरून वाटचाल करण्याच्या स्वतःच्याच ताकदीवर आपला विश्वास नसतो, तेव्हा तो मार्ग कितीही तेजोमय असला तरी त्याने काही फरक पडत नाही. आपण केलेली निवड योग्य आहे यावर जेव्हा आपला विश्वास नसतो, तेव्हा कितीही कृपावृष्टी झाली, तरी ती आपल्याला आश्वस्त करू शकत नाही. तो संशय मनात वारंवार डोकावत राहील; ती अनुभूती अपुरी आहे म्हणून नव्हे, तर आपण आपल्या स्वतःच्याच ग्रहणक्षमतेवर विश्वास ठेवत नाही म्हणून.

याचा काय अर्थ होतो, यावर विचार करा. ‘भक्कम पायाची उभारणी’ या संदेशातील ती साधिका तुम्हाला आठवते का, जिने तब्बल अकरा वर्षे ध्यान केले होते आणि तरीही ती विचारत होती, ‘हे खरे आहे का?’ तिची साधना निर्दोष होती आणि तिच्यातील बदल तिच्या आजूबाजूच्या सर्वांना स्पष्ट जाणवत होता, तरीही ती

*‘श्रद्धा’ या शब्दाचे इंग्रजी भाषांतर ‘फेथ’ (faith) म्हणजे केवळ ‘विश्वास’ असे केले जाते, पण ते अपूर्ण आहे. सहसा, ‘फेथ’चे वर्णन - जी गोष्ट तुम्ही पुराव्यानिशी सिद्ध करू शकत नाही, तिच्यावर विश्वास ठेवणे - असे केले जाते; याउलट ‘श्रद्धा’ ही संकल्पना यापेक्षा कितीतरी जिवंत - चैतन्यमय आहे. श्रद्धा म्हणजे विश्वास, आत्मविश्वास, प्रामाणिकपणा, दृढनिश्चय, निष्ठा आणि आंतरिक खात्री यांचे एकाच ज्योतीमध्ये झालेले एकीकरण आहे.*

त्यावर विश्वास ठेवू शकली नाही. का? संशय कधीच साधनेच्या संदर्भात नव्हता, तर तो स्वतःविषयी होता. स्वतःमध्ये रूपांतरण घडून येण्याच्या क्षमतेवर तिचा विश्वास नव्हता. उकळत्या पाण्यातील अंड्यासारखी तिची अवस्था झाली होती; ज्या अनुभवाने तिला मऊ, कोमल करायला हवे होते, त्याच अनुभवाने तिला अधिक कठीण बनवले होते. श्रद्धेने तो प्रश्न निर्माण होण्यापूर्वीच मिटवला असता; तिच्यातील संशयाशी युक्तिवाद करून नव्हे, तर असा भक्कम पाया रचून, जिथे संशयाला शिरकाव करण्यास वावच राहिला नसता.

आपल्याला श्रद्धेचा हाच पैलू समजून घेण्याची सर्वात जास्त गरज आहे - अध्यात्मात स्वतःवर विश्वास असणे तितकेच मूलभूत आहे, जितके ईश्वरी इच्छेपुढे समर्पित होणे. आणि या दोन्ही संकल्पना परस्परविरोधी नाहीत; तर त्या एकाच प्रक्रियेचे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहिलेले दोन पैलू आहेत. जेव्हा गोष्टी सोडून देण्यासाठी तुमचा स्वतःवर पुरेसा विश्वास असतो, तेव्हा ते समर्पण असते. जेव्हा तुमचा ईश्वरावर इतका विश्वास असतो की तुम्ही स्वतःला त्याच्या कृपादृष्टीस पात्र मानता, तेव्हा तो आत्मविश्वास असतो. श्रद्धा या दोन्ही गोष्टी एकाच वेळी कवेत घेते.

## त्या भूमीत काय अंकुरते?

बीज ती जमीन निवडू शकत नाही ज्यावर ते पडते, परंतु साधक ती निवडू शकतो; आणि साधक जी आंतरिक भूमी तयार करतो, त्यावरच पुढील सर्व गोष्टी ठरतात. जिथे खरा विश्वास नसतो, तिथे खरे प्रेम आणि खरे समर्पण असूच शकत नाही; पण जिथे विश्वास खरा असतो, तिथे आत्म्याचे एक जागृत शिल्प उलगडत जाते :

श्रद्धा म्हणजे ती भूमी - ते अधिष्ठान होय, जिथे प्रेम बहरते.
भक्ती म्हणजे असे प्रेम, ज्याला आपली दिशा सापडली आहे.
शरणागती म्हणजे अशी भक्ती, जिने फलिताविषयीची आपली आसक्ती सोडून दिली आहे.
लयावस्था म्हणजे अशी अवस्था होय, जी शरणागतीचेही विसर्जन झाल्यावर शेष राहते.

आपण हा क्रम पुन्हा एकदा, सावकाश समजून घेऊया :

श्रद्धेतून प्रेम विकसित होते.
प्रेमातून भक्ती प्रकटते.
भक्तीतून शरणागती जन्माला येते.
शरणागती लयावस्थेकडे नेते.

प्रत्येक अवस्था आधीच्या अवस्थेतून अगदी नैसर्गिकरित्या विकसित होते; जसे कळीचे फूल बनते आणि फुलाचे फळ होते. तुम्ही कळीला बळजबरीने फळ बनवू शकत नाही, पण तुम्ही मशागतीने जमीन कसदार बनवून, सूर्याला त्याचे काम करू देऊ शकता.

आता, हे ते सत्य आहे जे या नवीन मालिकेमध्ये आपल्या चिंतनाचे मुख्य सूत्र राहील : जेव्हा लयावस्था घडते, तेव्हाच खरा प्रवास सुरू होतो. कृपया या विधानावर काही वेळ शांतपणे मनन करा. जवळपास सर्वच आध्यात्मिक परंपरा आणि सिद्धांत असे मानतात की तादात्म्य पावणे हेच अंतिम ध्येय आहे, परंतु जे गूढवादी तिथपर्यंत पोहचले आहेत, ते यापलीकडे जाऊन सांगतात : हे शिखर म्हणजे अंतिम गंतव्यस्थान नसून, ते एक प्रवेशद्वार आहे. तुम्ही ज्या जीवनाच्या शोधात आहात, ती तर त्या दरवाजापलीकडे तुमची वाट पाहत असलेल्या खऱ्या जीवनाची केवळ पूर्वतयारी आहे; आणि या पूर्वतयारीची सुरुवात जमिनीच्या गुणवत्तेतून होते.

*श्रद्धा म्हणजे ती भूमी - ते अधिष्ठान होय, जिथे प्रेम बहरते.*
*भक्ती म्हणजे असे प्रेम, ज्याला आपली दिशा सापडली आहे.*
*शरणागती म्हणजे अशी भक्ती, जिने फलिताविषयीची आपली आसक्ती सोडून दिली आहे.*
*लयावस्था म्हणजे अशी अवस्था होय, जी शरणागतीचेही विसर्जन झाल्यावर शेष राहते.*

# ना डळमळीत, ना आंधळी

एक सूक्ष्म संकेत आहे, ज्यात एक शांत गर्जना दडलेली आहे : श्रद्धा कधीच अर्धवट किंवा डळमळीत असू शकत नाही. जर तुमची निष्ठा एखाद्या लुकलुकणाऱ्या दिव्यासारखी अस्थिर वाटत असेल, तर कृपया आपले अंतिम साध्य काय असायला हवे याबद्दल अंतर्मुख होऊन विचार करा. श्रद्धा ही उत्कट आणि दृढनिश्चयी असते; ती एखाद्या नंदादीपासारखी शांतपणे अखंड तेवत राहते, जिला कोणताही वादळवारा विझवू शकत नाही. कारण ज्योत प्रखर असते म्हणून नव्हे, तर दिव्याची वात पुरेपूर तेलामध्ये अविरत भिजलेली असते.

तसेच, श्रद्धा कधीही आंधळी नसते. ती एका अशा विलक्षण अनुभूतीतून जन्माला येते, जी तुमचे आंतरिक विश्व पूर्णपणे बदलून टाकते आणि हीच गोष्ट श्रद्धेला, निव्वळ समजुतीपासून किंवा वरवरच्या विश्वासापासून वेगळी ठरवते. हा असा वरवरचा विश्वास वंशपरंपरागत वारशासारखा पूर्वजांकडून मिळतो, ज्याचे कोणीही बारकाईने परीक्षण करत नाही. तुम्ही विश्वास ठेवता कारण तुमचे आई-वडील विश्वास ठेवतात किंवा तुमचा समाज विश्वास ठेवतो; कारण त्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यापेक्षा किंवा त्याला आव्हान देण्यापेक्षा, तो मान्य करणे सोपे असते. परंतु श्रद्धा अशा प्रकारे काम करत नाही, ती थेट आणि प्रत्यक्ष असते. जेव्हा तुम्ही ध्यानाला बसता आणि तुम्हाला निःसंदिग्धपणे एक दिव्य अस्तित्व जाणवते - जो आपला कल्पनाविलास नसतो किंवा गतस्मृतीतून आलेला प्रत्ययही नसतो - त्या क्षणी तुमच्या अंतरी खऱ्या श्रद्धेचा उदय होऊ लागतो. तुमचे स्वतःचे हृदयच त्याची साक्ष बनते.

म्हणूनच हार्टफुलनेस मार्गामध्ये ‘ध्यान’ हे केवळ एक तंत्र नाही; तर ती एक प्रयोगशाळा आहे जिथे श्रद्धा घडवली जाते. प्रत्येक ध्यानातून एका शाश्वत सत्याकडे जाण्याचे कवाड उघडते व ते तुमच्या पायाखालच्या जमिनीवर आणखी एक थर चढवते. आणि कालांतराने ती जमीन इतकी भक्कम होते की जेव्हा संशय दार ठोठावतो - जसे नेहमीच घडते - तेव्हा तुमच्या घराला हादरे बसणार नाहीत. याचा अर्थ असा नाही की तुमच्याकडे प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आहे; तर तुम्ही अशा एका भक्कम भूमीवर - श्रद्धेच्या अधिष्ठानावर उभे आहात, जिथे प्रश्नच उद्भवत नाहीत.

## असे जीवन, ज्याने हे सिद्ध करून दाखवले

आज, जेव्हा आपण पूज्य चारीजी महाराजांची नव्याण्णववी जयंती साजरी करत आहोत, तेव्हा या संदेशात वर्णन केलेल्या प्रत्येक गोष्टीवर क्षणभर थांबून विचार करणे योग्य ठरेल. ते विज्ञानात प्रशिक्षित आणि उद्योगजगतातील एक मुरब्बी व्यक्तिमत्त्व होते; ज्यामुळे प्रत्येक गोष्टीची सखोल छाननी करण्याची त्यांच्या मनाची जडणघडण होती. ते जेव्हा आपल्या सद्गुरूंना भेटले, तेव्हा त्यांनी त्यांच्या चरणी अशी श्रद्धा अर्पण केली जी कधीही आंधळी नव्हती; कारण ते दररोज स्वतःच्या 'हृदयाच्या प्रयोगशाळेत' तिची चाचणी - प्रचिती घेत असत. ती श्रद्धा कधीही डळमळीत झाली नाही, कारण तिने त्यांचे संपूर्ण जीवन व्यापून टाकले होते. त्यांचे हृदय म्हणजे एक तयार - सुपीक शेतजमीन होती. जेव्हा त्यावर प्राणाहुती बरसली, तेव्हा त्यातून बहरलेल्या आध्यात्मिक सुगीने जगभरातील साधकांचे पोषण केले आणि आजही ती सुगी आपले पोषण करत आहे. त्यांनी आपल्याला त्यांच्या श्रद्धाभावाची स्तुतीसुमने गाण्यास नव्हे; तर आपल्या स्वतःमध्ये तशीच नितांत श्रद्धा विकसित करण्यास सांगितले. आपण त्यांना अर्पण करू शकू अशी सर्वोत्तम श्रद्धांजली म्हणजे - एक सिद्ध हृदय होय!

## ध्यानकक्षातील ते दोन साधक

आपण ध्यानाला बसलेल्या त्या दोन साधकांकडे पुन्हा वळूया आणि ज्या प्रश्नाने आपण सुरुवात केली होती त्याचे उत्तर पाहूया. नेमके काय वेगळे होते? ती भूमी! एक हृदय तयार केले गेले होते - ते परिपूर्ण किंवा परिपक्व झालेले नव्हते परंतु त्यामध्ये एक इच्छा, एक उत्सुकता होती - एक शांत खात्री होती की काहीतरी खरे, शाश्वत घडू शकते; स्वतःच्या ग्रहण करण्याच्या क्षमतेवरचा तो दृढ विश्वास होता. ती तयारी म्हणजे कोणतीही उपजत बुद्धिमत्ता किंवा नशीब नव्हते, ती तर श्रद्धा होती. उकळत्या पाण्यातील त्या बटाट्याप्रमाणे, ते हृदय प्राणाहुतीच्या परिवर्तनकारक दिव्य ऊर्जेने मऊ झाले, जे काही समोरून प्रदान केले जात होते, ते ग्रहण करण्यास त्याने स्वतःला अधिक खुले केले होते. आणि हा गुण अशी कोणतीही व्यक्ती स्वतःमध्ये रुजवू शकते, जी हे रुजविण्याचा निर्णय घेते.

दुसरे हृदय नापीक नव्हते. या संदर्भात, हे आपण अगदी स्पष्टपणे जाणून घेतले पाहिजे की कोणतेही हृदय कधीही नापीक नसते. ते दुसरे हृदय केवळ अपरिपक्व होते; कदाचित

विचलित, सावध किंवा जुन्या निराशेचे अवशेष बाळगणारे होते जे कुजबुजले, ‘जास्त आशा ठेवू नकोस.’ ती कुजबुज ओळखीची वाटते का? आपल्याला ज्या भीतीचे विसर्जन करण्यास आठ संदेश लागले, तिचाच हा अंतिम प्रतिध्वनी आहे आणि तिच्यावरील उपायही पूर्वीसारखाच आहे - कोणतीही भव्य कृती नव्हे, तर एक छोटेसे, मागे न फिरणारे पाऊल! म्हणून, उद्या जेव्हा तुम्ही पुन्हा ध्यान कराल, तेव्हा जरा अधिक खुलेपणाने करा. हृदयाला थोडे कमी सावध राहू द्या, त्याचे कवच थोडेसे सैल करा. अंशमात्रही पुरेसे आहे. श्रद्धा ही कधीच पूर्णतः परिपक्व होऊन येत नाही; जमीन जशी प्रत्येक ऋतूगणिक हळूहळू खोलवर कसदार होत जाते, अगदी तशीच ती विकसित होत जाते - एकेक ध्यानसत्र आणि शांत विश्वासाचे एकेक पाऊल टाकत ती दृढ होते.

आपण सर्वजण आपल्या अंतरी युगानुयुगे चालत आलेली एक खोलवर रुजलेली भीती बाळगून असतो आणि म्हणूनच लहान मुलांप्रमाणे आपल्याला सतत आश्वस्त करण्याची गरज भासते. श्रद्धा म्हणजे आत्म्याने स्वतःलाच दिलेला आश्वासक हात आहे. हा असा क्षण असतो जेव्हा मूल मान्यतेसाठी (अनुमतीसाठी) बाहेर पाहणे थांबवते आणि त्याला जाणीव होते की त्याच्या स्वतःच्या पायाखालची भूमी सदैव भक्कम होती; ती तिथेच होती, ती केवळ आपण तिच्यावर विश्वास ठेवण्याचीच वाट पाहत होती.

जमिनीची मशागत करा, मग तुम्हाला उलगडेल की त्या बीजाला आधीपासूनच ठाऊक आहे की त्याला काय बनायचे आहे.

प्रेम आणि प्रार्थनेसह,
**कमलेश**



पूज्य श्री चारीजी महाराज यांच्या 99 व्या जयंतीनिमित्त
पूज्य दाजी यांचा संदेश
24 जुलै, 2026

# There's More Waiting For You

to go a little deeper

## HEARTFULNESS APP

A Quiet Place to Start

Carry your practice with you — download the free app and connect with a personal trainer anytime.

Free Download. Daily practice. Trainer always Available.

Heartfulnessapp.org

## MASTERCLASSES

Go Deeper at Home

Learn with Daaji relaxation, meditation, cleaning, and prayer through three freely offered video sessions.

Free Videos. Learn from Daaji. 3 classes.

Heartfulness.org/global/masterclass

## RETREAT

Time for Just You

Step away from the noise and into a peaceful weekend that quietly deepens everything.

Peaceful Setting. Deepen Practice. Weekend Stays.

Heartfulness.org/global/retreat

## HEARTSPOTS

Find a Centre Near You

Your nearest meditation centre is closer than you think at no cost.

6000+ Centres. Heartful Community. Free to Visit.

Heartspots.heartfulness.org

Scan to download the free app, always there when you need it.
Start with a guided session, and let the practice find its own rhythm in you.
The journey inward begins with a single, still moment.

heartfulness
purity weaves destiny